**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ८५/२०२२ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश**

फिर्यादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आरोपींविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या वकीलांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

२. फिर्याद व त्यासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. फिर्यादीचे असे कथन आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये विहीरीच्या वादावरुन वारंवार भांडणे होत असतात. दिनांक ०६/१०/२०२१ रोजी आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने शिवीगाळ व दमदाटी केली होती. फिर्यादी यांनी दिनांक ०६/१०/२०२१ रोजी आरोपी क्र. १ ते ३ विरुद्ध अदखलपात्र गुन्हा क्रमांक ७००/२०२१ हा कोरेगाव पोलीस स्टेशन येथे नोंदवला होता. त्यानंतर दिनांक ०७/१२/२०२१ रोजी आरोपींना त्यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली याची माहिती मिळाल्याने ते फिर्यादी यांच्या घरात परवानगी शिवाय जबरदस्तीने घूसले व त्यांनी फिर्यादी आणि त्यांची सुन दिशा विशाल जाधव यांना शिवीगाळ, दमदाटी करुन मारहाण केली. तसेच आरोपींनी फिर्यादीची सुन दिशा हिचा साडीचा पदर ओढून तिला लज्जा उत्पन्न करुन तिचा विनयभंग केला. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांचे पती व मुलगा यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर फिर्यादीचे पती व मुलगा आरोपींना जाब विचारण्याकरीता त्यांच्या घरी गेले असता आरोपी क्र. १ ते १३ हे उपस्थित होते. त्यावेळी आरोपी क्र. १ ते १३ यांनी फिर्यादी यांचे पती व मुलास बेदम मारहाण केली. तसेच आरोपी क्र. ७ ते १२ यांनी तुमच्या खाणदाणाचा आम्ही मुडदा पाडला तरी देखील पोलीस आमचे काही एक करु शकत नाहीत अशी धमकी दिली. त्यानंतर फिर्यादी ही पोलीस

स्टेशनला तक्रार देण्याकरीता गेली असता पोलीसांनी तुमची कालच तक्रार नोंदविलेली आहे असे म्हणून काढून दिले. त्यानंतर फिर्यादीने सदर तक्रार न्यायालयात दाखल केली आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वये पोलीसांनी गुन्हा दाखल करण्याचे व त्याचा तपास करण्याकरीता निर्देश देण्यासाठी फिर्यादीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (३) ची पुर्तता केलेली आहे हे दाखवणे आवश्यक आहे. फिर्यादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यांनी केवळ दिनांक ०६/१०/२०२१ रोजीचे अदखलपात्र गुन्हा क्रमांक ७००/२०२१ ची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे. त्यामुळे असे दिसून येते की, फिर्यादी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (३) अन्वये पुर्तता केलेली नाही. त्यामुळे फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वये केलेली विनंती ही रद्द करणेस क्रमप्राप्त आहे कारण फिर्यादीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (३) अन्वये पुर्तता करणे अनिवार्य आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे :

## <u>आदेश</u>

१) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वये गुन्हा नोंदवण्याची व पोलीसांना तपास करीता आदेश देण्याची विनंती नामंजूर करण्यात येते.

२) सदर प्रकरण फिर्यादीचे व इतर साक्षीदारांच्या सत्यापन पडताळणीकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये पुढील तारखेस ठेवण्यात यावे.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2023.08.01 16:07:01 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे)

दिनांक २८/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोरेगाव.